नि.फौ.के.नं. ०३/२०२१

नि. क्र. ५५

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०५ चा जबाब**

**नाव** – विजय लक्ष्मण चाळके, **वय**– ५० वर्षे,

**व्यवसाय** – पोलीस पाटील, गाव चाफवली,

**रा.** चाफवली, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरतपास – सरकारतर्फे सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेकडून –**

**०१.** दि. ०२/०८/२०२० रोजी मी चाफवली गावचा पोलीस पाटील म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी मला सागर जाधव यांचा दि. ०१/०८/२०२० रोजी रात्री फोन आला होता. त्याने मला फोनवर सांगीतले की, तो चार दिवस बाहेर होता वत्या रात्री तो घरी चाफवलीला आला होता. त्याने मला सांगीतले की, झोपायला जाताना त्याला एक दागीन्यांची डबी सापडलेली आहे. त्याने मला सांगीतले की, ते दागीने त्याचे नाहीत, कोणाचे आहेत त्याची चौकशी करा. मी त्याच रात्री पोलीस स्टेशनला त्या घटनेविषयी कळवले.

**०२.** दुस–या दिवशी दि. ०२/०८/२०२० रोजी सकाळी ०७.०० वाजता चाफवली येथे सागर जाधव यांच्या घरी गेले. त्यावेळी सागरकडे मिळालेली दागीन्यांची डबी त्याची आत्या आणि आजी यांच्यापैकी कोणाची आहे त्याची विचारणा केली. त्यांना ते दागीने देखील दाखवले. त्यावेळी त्याच्या आजीने ते दागीने तीचे असल्याचे सांगीतले. त्याच्या आजीने आमच्या समक्ष सांगीतले की ते दागीने तीच्या बॅगेतील आहेत.

**०३.** त्या ठिकाणी सागरची दुसरी आत्या स्वाती देखील आली होती. मला एकुण किती वजनाचे दागीने होते ते सांगता येणार नाही. सागरच्या आजीने आमच्या

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.24 13:05:13 +0530

समक्ष त्यांची स्वतःची बॅग उघडून पाहीली. तीने सागरकडे मिळून आलेले दागीने आणि बॅगमधील दागीने बरोबर आहेत का ते तपासले. तीने आमच्या समक्ष ते तेच दागीने असल्याचे सांगीतले. पोलीसांनी या विषयी माझा जबाब घेतला होता. त्या दागीन्यांचे पुढे काय केले ते मला सांगता येणार नाही.

**०४.** माझे टिपण माझ्याच सांगण्यानुसार नोंद झाले होते. ते मी वाचून पाहीले होते.

(**सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा का.क. १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आणि फौ.प्र.सं.क. १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पध्दतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.**)

**०५.** मी पोलीसांनी मला वाचून दाखवण्यात आलेला रेखांकीत मजकुर कधीही टिपण नोंदविताना सांगीतला नव्हता. सबब तो माझ्या तपासटिपणात कसा नोंद आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. मी सागर आणि शशिकांत जाधव यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, ते माझे परीचयाचे असल्याने माझ्या टिपणातील रेखांकीत मजकुर हा मी कधी पोलीसांना सांगीतलाच नव्हता असे नमुद करत आहे. आज रोजी आरोपी क्र.०३ न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र.०१ व ०२ ला पाहील्यास मी ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपींतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडून –</u>**

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२/०८/२०२० नंतर या केसच्या अनुषंगाने माझी पोलीसांशी वैयक्तीक भेट झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की,

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.24 13:05:06 +0530

त्यामुळे दि. ०२/०८/२०२० नंतर माझ्या सांगण्यानुसार पोलीसांनी माहीती लिहून घेतली असे काही घडले नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.02.24 13:05:02 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – २४/०२/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**